**File No.PBN-18021(11)/76/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI**

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शा.नि.क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/ का-1444, दि. 16 फेब्रुवारी, 2008
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचा शा.नि.क्र.बीडीजी-2016/प्र.क्र.172/इमा-1, दि.19.09.2016
3. गृह विभागाचा शासन निर्णय क्रं.सीसीटी -3615/ प्र.क्र.36/पोल - 3, दि.01.01.2017
4. गृह विभागाचा शासन निर्णय क्रं.दुरुस्ती - 0117/ प्र.क्र.69/पोल - 7, दि.21.09.2017
5. प्र.पोलीस अधिक्षक, परभणी यांचे प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव क्रं.पव्यशा - 4 /अनुदान/2018/7589, दि.10.12.2018
6. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रमांक शांतजि/अणूविदयुत/2018/68, दि. 8/1/2019
7. पोलीस अधिक्षक, परभणी यांचेकडील निधी मागणी प्रस्ताव क्रं.पोअ/सीसीटीव्ही/निधी/2019-249, दि.12.03.2019

---

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/नि.वि./का.क्र.1/ 791 दि. 14मार्च, 2019

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत पोलिस व तुरुंग या विभागांच्या आस्थापनांमधील पायाभुत सुविधा पुरिवणे आणी CCTV संनिरिक्षण यंत्रणा उभारणे व इतर उपयुक्त तंत्रज्ञान पुरविणे या कामासाठी रु.68.70 लक्षची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

पोलीस अधिक्षक, परभणी यांनी संदर्भ क्रं.7 अन्वये निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या कामासाठी **रु. 66.21 लक्ष (अक्षरी रुपये सहासष्ट लक्ष एकवीस हजार फक्त)** च्या रकमेस निधी वितरण करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव | प्रशासकिय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरित निधी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | **जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी** | | |
| | **पोलिस व तुरुंग या विभागांच्या आस्थापनांमधील पायाभुत सुविधा पुरिवणे आणी CCTV सनिरिक्षण यंत्रणा उभारणे व इतर उपयुक्त तंत्रज्ञान पुरविणे** | | |
| 1 | परभणी शहरामध्ये खालील ठिकाणी सि.सि.टी.व्ही.यंत्रणा बसविणे | 68.70 | 66.21 |
| | **एकूण** | **68.70** | **66.21** |

**(अक्षरी रुपये सहासष्ट लक्ष एकवीस हजार फक्त)**

## अटी व शर्ती

1. **राज्य निवडणुक आयोगाचे वेळोवेळी निवडणुकीसंदर्भातील आचारसंहितेचे निर्गमित होणारे आदेश विचारात घेवुन योग्य कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.** अंतिम करण्यात आलेले अंदाजपत्रक आपल्या मान्यतेने या कार्यालयास सादर करुनच निधीची मागणी करावी. तसेच गृह विभागाचे शासन निर्णय क्र.सीसीटी-3615/प्रक्र36/पोल-3 दि.09 जानेवारी 2017 मधील मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहुन विहीत कार्यवाही करावी. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत यंत्रणेची राहील.
2. उपरोक्त कामाचे किंमतीच्या रकमेची एकच ई-निविदा करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदर निधी खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या दर करार / मार्गदर्शक सूचना/निकषांनुसारच खर्च करण्यात यावा.
3. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनांवर/कामावर खर्च करण्यात येवू नये. उपरोक्त कामाच्या आवश्यकतेनुसारच पुरवठा आदेश देण्यात यावा.
4. या योजनेंतर्गतच्या कामांना/अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रीक मान्यता घेतल्यानंतरच व त्यातील सुचनांचा पालन करुनच कामांना सुरुवात करणे आवश्यक आहे.

5. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.

6. सदरील कामासाठी या योजनेतून कोणत्याही प्रकारचा आवर्ती खर्च करणे अनुज्ञेय नाही.

7. सदर योजनांची/कामांची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी. सदरील सि.सि.टी.व्ही. यंत्रणेची मालमत्ता व्यवस्थापनाची व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी पोलीस अधिक्षक, परभणी कार्यालयाची राहील. सदरील कामाचा मुल्यमापन अहवाल दरवर्षी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

8. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाची पुनरावृत्ती झालेली नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे. कामाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

9. या योजनेसाठी / कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

10. सदरील सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

11. या योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यानिवयीन यंत्रणेची राहील.

12. प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच योजनेवर खर्च करण्यात यावा. तसेच सदरील योजना अन्य कोणत्याही निधीतून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

13. या योजनेंतर्गत कामांची खाजगी/त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकेल. तेव्हा योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा. आणि दरमहा 5 तारखेपूर्वी या कार्यालयास अहवाल सादर करावा.

14. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील. रु.3.00 लाखांवरील कामांसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

15. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे / शासनाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.

16. या योजनेतील खर्च 2018-19 या वित्तीय वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत कॅशफ्लोनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक (भांडवली) ओ-51**

4515, इतर ग्राम विकास कार्यक्रमावरिल भांडवली खर्च

(00) 800, इतर खर्च

(49) जिल्हा योजना- परभणी

(49)(01) इतर जिल्हा योजना (4515 0629)

53 - मोठी बांधकामे

प्रति,

पोलीस अधिक्षक,

परभणी

-Sd/-

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,

जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. मह[illegible] नागपूर -2

2. जि[illegible] कोषागार अधिकारी, परभणी

Digitally signed by P S V A SANKAR
Date: 2019.03.14 1[illegible]:49:25 IST
Reason: Approved

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,

जिल्हा नियोजन समिती, परभणी